पोलीस ठाणे शिल्लेगांव ता. गंगापूर औरंगाबाद (ग्रा)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिल्लेगांव **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0211 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/07/2020 20:52 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |
| 3 | माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ | 65 |
| 4 | माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ | 43a |
| 5 | माहिती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम २००८ | 43(d) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Date From (दिनांक पासून):** 27/07/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/07/2020

**Time From (वेळेपासून):** 14:05 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 28/07/2020 **Time (वेळ):** 20:11 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/07/2020 20:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिल्लेगाव , गंगापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** शिल्लेगांव

**District(State) (जिल्हा(राज्य)):** औरंगाबाद ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): राजकुमार सायसिंग पाडवी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1982 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड,शिल्लेगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड,शिल्लेगांव,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोंळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सय्यद शौकत अली साबीर अली | | | 1. शिल्लेगाव,शिल्लेगांव,औरंगाबाद ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | ओपो कंपनीचा मोबाईलA31 जुना वापरता | 10,000.00 |
| 2 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | एक मेमरी कार्ड SanDisk MICRO SDHC I 16 GB | 425.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 10,425.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी राजकुमार सायसिंग पाडवी, वय-38 वर्षे- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड, मो. नं. 9921754458.समक्ष सरकारतर्फे फिर्याद लिहुन देतो की, मी माहे सप्टेंबर 2019 पासुन लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.दि.27/07/2020 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, बीड येथे हजर असतांना पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचे तोंडी सांगणे वरुन तक्रारदार नामे बळिराम अप्पा गिधाने, वय-22 वर्षे धंदा- शेती, रा.नागरे बाभुळगाव, ता: गंगापुर जि.औरंगाबाद हे हजर असलेल्या शिल्लेगाव ता.गंगापुर जि.औरंगाबाद येथे शासकीय वाहनाने सापळा कार्यवाहीसाठी लागणारे सर्व साहीत्य घेवुन सापळा पथकासह सुरक्षीत येवुन समक्ष त्यांचेकडे लोकसेवकाकडुन लाचेची मागणी होत असलेबाबत समक्ष कळविले. त्यावरुन तक्रारदार श्री गिधाने यांची स्वहस्तक्षरात पंचासमक्ष तक्रार नोंदवुन घेतली ति खालीलप्रमाणे आहे. मी बळीराम अप्पा गिधाने, वय 22 वर्ष, धंदा शेती, रा. नागरे बाभुळगाव ता.गंगापुर जि औरंगाबाद.आज रोजी आपणा समक्ष शिल्लेगाव येथे हजर राहुन तक्रार देतो की, मी वरिल ठिकाणचा राहणारा असुन शेती व्यवसाय करुण उपजिविका भागवतो व माझेकडे टाटा-407 कंपणीचे टेम्पो क्रमांक एमएच 28 एबी 8297 असुन तो मी वाळु वाहतुकीस वापरतो. सदर टेम्पो वाळुवर चालवण्यासाठी मी पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथील पोलीसांना हप्त्यापोटी महिन्याला 20000/- रुपये देतो. दि.24.07.2020 रोजी आम्ही टेम्पोमध्ये वाळु भरुण रांजणगाव ता.गंगापुर ला वाळु टाकणेसाठी रात्री गेला. टेम्पो वाळु टाकण्यासाठी रांजणगावला गेल्यानंतर मी गाडी भरणारे लेबरसह लासुरगावकडे माझे बोलेरो क्रमांक एम एच 20 डीजे 4284 ने येत असताना मला पोलीस स्टेशन शिल्लेगाव चे कर्मचारी यांनी माझी गाडी अडवुन तुझ्यागाडीतील लोक हे तुला वाळु वाहतुकीत मदत करणारे आहेत म्हणुन तुम्ही पोलीस स्टेशनला चला असे सांगितले व आम्हाला पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे आणले. पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे आल्यानंतर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सय्यद साहेब यांना मी माझे लेबर सोडुण देणे बाबत विनंती केली असता मला पोलीस निरीक्षक सय्यद साहेब यांनी सांगितले की, तुझ्या गाडीतील लोक हे वाळुचे लोकेशन देणारे आहेत त्यांना सोडण्यासाठी तुला मला 30,000/- (तीस हजार रुपये) द्यावे लागतील. नाहीतर मी त्यांचेवर 109 प्रमाणे गुन्हा दाखल करेल असे म्हणाले. मी त्यांना सदर लोक हे वाळुचे लोकेशन देणारे नसुन ते माझे लेबर आहेत असे सांगितले व त्यांना सोडुन देणे बाबत विनंती केली व आज माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले. त्यावर सय्यद साहेब यांनी मला उद्या पैसे आणुन दे असे सांगितले व माझे लेबर सोडुन दिले. त्यानंतर मला काल दिनांक 26.07.2020 रोजी पोलीस स्टशेन शिल्लेगाव येथील पोलीस निरीक्षक सय्यद यांनी पैसे घेवुन येण्यासाठी निरोप दिला त्यावर मला कळुन चुकले की पोलीस निरीक्षक सय्यद हे मला माझे कामासाठी मागत असलेले पैसे हे लाचेचे आहेत. मला पोलीस निरीक्षक सय्यद यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांचेशी संपर्क करुन माझे तक्रारी बाबत सांगितले असता त्यानी मला पोलीस निरीक्षक श्री राजकुमार पाडवी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड यांचा मोबाईल क्रमांक दिला व त्यांचेशी संपर्क करण्यास सांगीतले असता मी पोलीस निरीक्षक राजकुमार पाडवी यांचेशी फोनद्वारे संपर्क केला व त्यांना माझी तक्रार थोडक्यात सांगितली व शिल्लेगाव येथे येऊन माझे तक्रारीप्रमाणे कारवाई करणे बाबत विनंती केली. वगैरे मजकुराची तक्रार आहे.वरील प्रमाणे शिल्लेगाव येथे सुरक्षीत ठिकाणी लेखी तक्रार नोंदविलेनंतर आम्ही पुढील कार्यवाही कामी ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,बिड येथे गोपनिय कामासाठी हजर असलेले 1)श्री.विनोद अरुण बडे, वय-33 वर्षे नोकरी-कर सहाय्यक 2)श्री पांडुरंग भिमराव गर्जे, वय- 28 वर्षे, व्यवसाय- नोकरी- कर सहाय्यक दोघे नेमणुक- वस्तु व सेवाकर कार्यालय बिड यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तक्रारदार यांनी त्यांचे तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे त्यांचेकडे खरोखरच लाचेची मागणी होत आहे अगर कसे याची पडताळणी करणेकरीता तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्यांसह शिल्लेगाव येथील सुरक्षीत ठिकाणावरुन तक्रारदार श्री गिधाने व त्यांचे मित्र रामेश्वर सुकासे यांचेकडे शासकीय व्हाईस रेकर्डर मध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते चालु स्थीतीत देण्यात आले व त्यांना पंच नं. 01श्री.बडे यांचेसह पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे पोलीस निरीक्षक श्री.सय्यद यांचे भेटी करीता सविस्तर सुचना देवुन रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांचा मित्र सुकाशे व पंच क्र.01 श्री.बडे याने आम्हास फोनद्वारे कळविले की, तक्रारदार श्री.गिधाने यांना पोलीस स्टेशनला पकडुन ठेवलेल आहे.त्यानंतर आम्ही सापळा पथक व पंच क्र.02 श्री.गर्जे यांचेसह पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे आलो असता पोलीस निरीक्षक श्री.सय्यद यांना आमचा व सापळा पथकाचा परीचय देवुन तक्रारदार श्री.गिधाने कोठे आहे याबाबत विचारणा केली असता त्यावर पोलीस निरीक्षक सय्यद यांनी सांगीतले की, तक्रारदार श्री.गिधाने माझ्या कक्षामध्येच आहे त्यावरुन आम्ही पोलीस निरीक्षक यांचे कक्षामध्ये जावुन श्री.गिधाने यांना शासकीय व्हाईस रेकर्डर बाबत विचारणा केली व सुरक्षीत ठिकाणाहुन रवाना केल्यापासुन काय हकीकत घडली याबाबत विचारणा केली असता, त्यांनी पंचासमक्ष सांगीतले की, मी माझा मित्र सुकासे व पंच क्र.01 श्री.बडे पोलीस स्टेशन शिल्लेगाव येथे गेलो तेथे गेल्यानंतर मी पोलीस स्टेशन येथे विचारणा केली की, सय्यद साहेब आहेत काय त्यावर कर्मचाऱ्याने सांगीतले की, साहेब रुम मध्ये आहे त्यावर मी व माझा मित्र सुकासे असे सय्यद साहेबांच्या रुममध्ये गेलो तेथे गेल्यानंतर सय्यद साहेबांनी विचारणा केली की तुझ्यासोबत कोण आहे हे माझे मित्र आहे दरम्यान सय्यद साहेबांनी यांना बाहेरच थांबण्यास सांगीतले. दरम्यान सय्यद साहेब व माझ्यात कामाविषयी बोलणी झाली व दरम्यानच सय्यद साहेबांनी मला विचारणा केली त्या दिवशी तुझे माणसे सोडुन दिले त्याचे काय केले तु आणले का पैसे त्यावर मी सय्यद साहेबांनी मी सांगीतले की, आता बारा हजार रुपये आणले आहेत त्यावर सय्यद साहेब मला म्हणाले की, तुला त्या दिवशी तिस हजार रुपये सांगीतले होते ना, व लागलीच सय्यद साहेब त्यांचे खुर्चीवरुन उठुन माझ्याकडे आले व त्यांनी माझी अंगझडती घेण्यास सुरुवात केली, माझ्या खिश्यातील पाकीट व काही कागदवत्रे काढले व माझा मोबाईल ताब्यात घेवुन बंद केला त्यानंतर माझ्या अंगावरील शर्टचे उघडत असताना मला मारहाण करतील या भितीमुळे मी त्यांचे रुममधुन बाहेर पळालो त्यावर सय्यद साहेबांनी त्याला पकडा असा आवाज दिला त्यावरुन पोलीस ठाण्यातील एक नागरीक व एक होमगार्ड माझ्या पाठीमागे लागले त्यामुळे मी भितीने पळालो परतु काही अंतरावरच एक होमगार्ड व एक नागरीक यांनी मला पकडले दरम्यान मी माझ्याकडील शासकीय व्हाईस रेकर्डर बाजुला टाकले ते शासकीय व्हाईस रेकर्डर एका होमगार्ड ने आपल्याकडे घेतले व मला पोलीस ठाणे लाघेवुन आले त्यानंतर मला पोलीस स्टेशनला आणल्यानंतर सय्यद साहेबांच्या कक्षात बसविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक सय्यद साहेबांनी सदरील होमगार्ड यांचेकडील शासकीय व्हाईस रेकर्डर ताब्यात घेतले व ते बंद करुन त्यामधील मेमरी कार्ड बाहेर काढुन तु काय माझी रेकर्डीग करुन माझ्यावर काय ट्रप आणतोस का मी ऍन्टी करप्शनला काम केलेले आहे मला तुझ्या या मशीनची सर्व माहीती आहे बघ तुझ्यासमोरच यातील रेकर्ड झालेले बोलणे डिलीट करतो. असे म्हणुन डिलीट केले व लागलीच सय्यद साहेब हे मेमरी कार्ड घेऊन गेले. पोलीस निरीक्षक सय्यद यांनी माला दमदाटी करत तुझ्यावर गुन्हा दाखल करतो अशी धमकी दिली त्यावेळी मी घाबरलेल्या मन:स्थितीत होतो.त्यानंतर आम्ही पोलीस निरीक्षक सय्यद यांना पंचासमक्ष शासकीय व्हाईस रेकर्डर ची मागणी केली असता त्यांनी त्यांचे ताब्यात असलेल्या शासकीय व्हाईस रेकर्डर व त्यामधील मेमरी कार्ड पंचासमक्ष आमच्या ताब्यात दिले. त्यांनतर आम्ही पंचासमक्ष सदरचे मेमरी कार्ड ची बारकाईने पाहणी केली असता सदरच्या मेमरी कार्डवर पाठीमागील बाजुस ईलेक्ट्रनीक चिपला ओरखाडे (स्क्रश) मारल्याचे दिसुन आले आहे. सदरचे मेमरी कार्ड हे शासकीय व्हाईस रेकर्डर मध्ये टाकुन त्यामधील झालेले संभाषण हे तपासुन पाहीले असता सदरचे मेमरी कार्ड ब्लॅंक दिसुन आले. त्यानंतर आम्ही पोलीस निरीक्षक श्री.सय्यद यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सय्यद शौकत अली साबीर अली, वय-54 वर्षे, व्यवसाय-पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन शिल्लेगाव जि.औरंगाबाद रा: ह.मु गिताबन लासुर स्टेशन ता.गंगापुर जि.औरंगाबाद असे सांगीतले. तरी दिनांक 27/07/2020 रोजी यातील लोकसेवक सय्यद शौकत अली साबीर अली, वय-54 वर्षे, व्यवसाय-पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन

शिल्लेगाव जि.औरंगाबाद रा.ह.मु गिताबन लासुर स्टेशन ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी तक्रारदार श्री.गिधाने यांचेकडे तक्रारदार यांची 407 टाटा टेम्पो हे वाळु वाहतुकीसाठी वापरतात व त्यासाठी पोलीस लोकेशन देणा-या पकडलेल्या मुलांवर सी.आर.पी.सी. 109 प्रमाणे कारवाई न करण्यासाठी 30,000/-रुपये लाचेची मागणी केली असता त्यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांचेकडील शासकीय व्हाईस रेकर्डर स्वत:च्या ताब्यात घेवुन त्यामधील लाचमागणी कारवाई दरम्यान झालेले संभाषण डिलीट करुन सदरच्या मेमरी कार्डला पाठीमागील बाजुस ईलेक्ट्रनीक चिपला ओरखाडे (स्क्रश) मारुन पुरावा नष्ट केला व सरकारी मालमत्ता मेमरी कार्ड SanDisk MICRO SDHC I 16 GB निकामी केले म्हणुन माझी त्यांचेविरुद्ध कलम 7 ला.प्र.का 1988 (सुधारीत 2018) व 201 भादवी तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा- 2000 कलम 65, 43 (a) (d) अन्वये कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): SANDIP PRABHUNATH GAVIT

**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant of Police)

**No.**(क्र.): 15101000402SRG **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस ठाणे अंमलदार
पोलिस ठाणे शिल्लेगाव
ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

**Signature of Officer In charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Shaukat Sayyed Ali

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI